# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री ता. कागल जि. कोल्हापूर

## उपक्रम - "वाचन संकल्प महाराष्ट्राचा 2024-2025"

# अहवाल (Report)

दूधसाखर महाविद्यालयात संपन्न झालेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थीनीला पारितोषिक देताना प्राचार्य डॉ.संजय पाटील सोबत ग्रंथपाल अतुल नगरकर

दूधसाखर मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचा समारोप . बिद्री. येथील दूधसाखर महाविद्यालयामध्ये मराठी,हिंदी,इंग्रजी आणि ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा 2025 या उपक्रमाची सांगता झाली. या उपक्रमांतर्गत ग्रंथालयातील उपविभागांची स्वच्छता, ग्रंथ प्रदर्शन, सर्वांसाठी मुक्त वाचन, दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शन, परिसंवाद, लेखक व विद्यार्थी वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा, सामूहिक वाचन ,कथन, ग्रंथ परीक्षण असे विविध कार्यक्रम पार पडले. वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार होण्यासाठी या उपक्रमाचा विद्यार्थांना व सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांना खूप फायदा झाला.

ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.संजय पाटील यांच्या हस्ते झाले. प्रा. डॉ. एस. ए. साळोखे यांनी वाचन कौशल्य कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले. तसेच पुस्तकाचे सामूहिक वाचन उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. स्थानिक लेखक परिसंवाद व नव साहित्याची ओळख या विषयावर नवलेखक प्राध्यापक डॉ. शिवाजी देसाई यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. लेखक विद्यार्थी वाचन संवाद उपक्रमांतर्गत स्थानिक नवलेखक श्री. विजय पाटील यांची मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली.

पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यांनी चांगला सहभाग नोंदविला कथन स्पर्धेमध्ये कथाकथन कसे करावे याविषयी प्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मिरासदारांच्या व्यंकुची शिकवणी या कथेचे कथन करून दाखविले.

26 जानेवारी 2025 रोजी विजयी स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक व ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक ग्रंथपाल अतुल नगरकर यांनी तर आभार प्रा.डॉ.प्रदीप कांबळे यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.सुहानी पाटील यांनी व प्रा.संपदा वारके यांनी केले. प्रा.डॉ.वैशाली कांबळे,नॅक समन्वयक डॉ.एस.जी.खानापुरे, जगन्नाथ कांबळे,संग्राम भोईटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाविद्यालयात घेण्यात आलेल्या उपक्रमांचे वेळापत्रक:

दूधसाखर महाविद्यालय बिद्री

उपक्रम - "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

कार्यक्रमाचे वेळापत्रक

दि. 27/12/2024

| अ नं. | दिनांक | कार्यक्रम स्वरूप | स्थळ आणि वेळ |
|---|---|---|---|
| 1 | 27-28/12/2024 | ग्रंथालय स्वछता | ग्रंथालय पूर्ण दिवस |
| 2 | 30-31/12/2024 | ग्रंथ प्रदर्शन | ICT Hall सकाळी 11 ते दुपारी 4 |
| 3 | 01/01/2025 to 15/01/2025 | सर्वांसाठी मुक्त वाचन प्रवेश (विनाशुल्क प्रवेश) | ग्रंथालय पूर्ण दिवस |
| 4 | 01/01/2025 to 15/01/2025 | दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन | ICT Hall सकाळी 11 ते दुपारी 4 |
| 5 | 01/01/2025 | वाचन कौशल्य कार्यशाळा व पुस्तकाचे सामूहिक वाचन | ICT Hall सकाळी 11 ते 12 |
| 6 | 02/01/2025 | स्थानिक लेखक परिसंवाद व नावसाहित्याची ओळख **(स्थानिक लेखक- डॉ. शिवाजी देसाई)** | ICT Hall सकाळी 11 ते 12 |
| 7 | 03-07/01/2025 | लेखक-विद्यार्थी वाचन संवाद **(दिनांक 06/01/2024 सोमवार, स्थानिक नवलेखक- श्री ~~शशी~~ विजय दरेकर) पाटील)** | ICT Hall सकाळी 11 ते 12 |
| 8 | 16/01/2025 | पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा | ICT Hall सकाळी 11 ते 12 |
| 9 | 26/01/2025 | प्रोत्साहनपर बक्षीस वितरण (प्रशस्ती पत्र व ग्रंथ भेट) | ध्वजवंदन झालेनंतर मा. प्राचार्य यांच्या हस्ते.....सकाळी 8 वाजता |

Convenor
(ग्रंथपाल- अतुल नागरकर)

I/C प्राचार्य
Principal
दूधसाखर महाविद्यालय
बिद्री (मौनीनगर),
ता कागल जि कोल्हापूर

**दिनांक - 26 जानेवारी 2025**

**पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धा विजे त्यांना प्रशस्तिपत्र व पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले.**

**पुस्तक परीक्षण - प्रथम क्रमांक - स्नेहल युवराज पवार - B.Sc. 1**

**(मोबाइल नंबर - 9699647274)**



।। विद्या परम् भूषणम्।।

श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

ता.कागल, जि.कोल्हापूर ४१६२०८

'B' Grade Reaccredited by NAAC ( CGPA 2.19 )

## प्रमाणपत्र

श्री/कु. ......स्नेहल......युवराज......पोवार...................हा / ही गुरूवार दि.१६/०१/२०२५ रोजी दूधसाखर महाविद्यालय, ग्रंथालय विभागामार्फत आयोजित केलेल्या "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या कार्यक्रमातंर्गत 'पुस्तक परीक्षण स्पर्धा / कथन स्पर्धेमध्ये आपण सहभाग नोंदवून ...प्रथम...... क्रमांक मिळविला. याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रा.अतुल नगरकर<br>समन्वयक, | डॉ. एस.जी. खानापूरे<br>समन्वयक, अंतर्गत हमी कक्ष | प्रा.(डॉ.) संजय पाटील<br>प्राचार्य |

**पुस्तक परीक्षण - द्वितीय क्रमांक - गौरी रंगराव सुतार - B.Sc. 1 (मोबाइल नंबर - 7385897327)**




**पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा - तृतीय क्रमांक - समृद्धी रघुनाथ परीट - B.Sc. 1 (मोबाइल नंबर - 9022778365)**



## कथन स्पर्धा - प्रथम क्रमांक - रेहाना कलंदर मुल्लाणी - B.A. – 2




## कथन स्पर्धा - द्वितीय क्रमांक - तनुजा खाडे - B.Sc. 1




**दिनांक 27 आणि 28 डिसेंबर 2024 ग्रंथालय स्वच्छता:**








BOYS READING ROOM
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2024-12-27(Fri) 02:35(pm)
28°C
82°F
Google


GPS Map Camera
Bidri, Maharashtra, India
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Lat 16.426495°
Long 74.14853°
28/12/24 03:16 PM GMT +05:30
Google




## दिनांक 30-31 डिसेंबर 2024 ग्रंथ प्रदर्शन:




ग्रंथ प्रदर्शन
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
28°C
82°F
2024-12-31(Tue) 11:43(am)
Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google


दूधसाखर महाविद्यालय बिद्री
वाचन संकल्प महाराष्ट्राचा
ग्रंथ प्रदर्शन
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
"A Reader today is a Leader tomorrow"
युवक मित्रांनो...
स्वामी विवेकानंद ग्रंथावली
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
28°C
82°F
2024-12-31(Tue) 11:42(am)
Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google


C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2024-12-31(Tue) 11:50(AM)
28°C
82°F
Doodhsakhar College, Bidri
Google





Books are the foundation of wisdom
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2024-12-31(Tue) 12:38(pm)
28°C
82°F
Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google


C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2024-12-31(Tue) 11:58(am)
28°C
82°F
Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google



## महाविद्यालयातील वाचकांसाठी सूचना:



# नोटीस

दि. 30 / 12 / 2024

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय स्टाफ यांना कळविण्यात येते की, शासन व विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दि. 31.12.2024 ते 16.01.2025 या काळात आपल्या महाविद्यालयात आयोजित केला आहे तरी सर्वांनी सोबत जोडलेल्या कार्यक्रमाचे वेळापत्रकानुसार सर्व कार्यक्रमांना उपस्थित रहावे.

सोबत - कार्यक्रमाचे वेळापत्रक

समन्वयक
(प्रा. अ. रा. नगरकर)

(प्रा.डॉ. संजय पाटील)
I/C प्राचार्य
महाविद्यालय
बिद्री (मौनीनगर)
ता. कागल जि. कोल्हापूर

| अ.नं. | नाव | सही | अं.नं | नाव | सही |
|---|---|---|---|---|---|
| | कला विभाग | | | शास्त्र विभाग | |
| 1 | डॉ. जाधव सी. वाय. | | 19 | प्रो.डॉ. धायगुडे एच. डी. | |
| 2 | डॉ. पाटील डी. एन. | | 20 | डॉ. कुलकर्णी एस. एन. | |
| 3 | डॉ. साळोखे एस. ए. | | 21 | डॉ. गंगावणे एस. ए. | |
| 4 | प्रो.डॉ. वारके ए. जे. | | 22 | प्रो.डॉ. झेंडे एस. एन. | |
| 5 | डॉ. देसाई एस. बी. | | 23 | श्री. चोपडे आर. बी. | |
| 6 | प्रो.डॉ. पाटील एस. आर. | | 24 | डॉ. सावंत एस. के. | |
| 7 | श्री. माने ए. बी. | | 25 | डॉ. खानापूरे एस. जी. | |
| 8 | प्रो.डॉ. करपे एल. एस | | 26 | प्रो.डॉ. सनदी के. आर. | |
| 9 | प्रो.डॉ. पाटील एन. एम. | | 27 | डॉ. पाटील एस. एस. | |
| 10 | प्रो.डॉ. पाटील एन. डी. | | 28 | डॉ. श्रीमती पाटील जे. एम. | |
| 11 | श्रीमती पाटील सुहानी सा. | | 29 | डॉ. पाटील आर. एस. | |
| 12 | डॉ. कांबळे प्रदिप ए. | | 30 | श्री. पाटील वाय. एस. | |
| 13 | श्री. कांबळे अविनाश सु. | | 31 | डॉ. पाटील एस. एच. | |
| 14 | श्री. पाटील दिगंबर के. | | 32 | श्रीमती वारके संपदा बा. | |
| 15 | डॉ. परीट शिवाजी आ. | | 33 | श्री. घोडके समीर म. | |
| 16 | श्री. सुतार सुनिल व. | | 34 | डॉ. पोवार रोहित आर. | |
| 17 | श्री. पाटील किशोर द. | | 35 | डॉ.श्रीमती कांबळे वैशाली अ. | |
| 18 | श्री. पाडळकर संतोष ए. | | 36 | श्री. नगरकर ए. आर. | |
| | | | 37 | श्री. मिठारी एस.एस. | |
| | | | 38 | श्री. पाटील ए. डी. | |
| | | | 39 | श्री. पाटील एस. जी. | |
| | | | 40 | श्री. मगदूम अवधूत ब. | |
| | | | 41 | श्री. परीट निलेश के. | |
| | | | 42 | श्री. लोहार विनायक वि. | |
| | | | 43 | श्री. सावंत रोहित पां. | |
| | | | 44 | श्रीमती आंगज जे.एस. | |
| | | | 45 | श्रीमती पाटील एम. बी. | |
| | | | 46 | श्रीमती पाटील क्रांती अ. | |

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा

## नोटीस

30/12/2024

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना कळविण्यात येते की, वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम दि. 31/12/2024 ते 16/01/2025 या काळात आपल्या महाविद्यालयात आयोजित केला आहे. तरी सर्वांनी सोबत जोडलेल्या कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहावे व होणाऱ्या स्पर्धेत सहभाग नोंदवावा. ज्यांना पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेमध्ये भाग घ्यायचा आहे, त्यांनी आपली नावे ग्रंथपाल अतुल नगरकर यांचे कडे दि. 12/01/2025 पर्यन्त द्यावीत, स्पर्धा 16/01/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता ICT हॉल येथे होणार आहे.

सोबत: कार्यक्रमाचे वेळापत्रक

समन्वयक
(ग्रंथपाल - अतुल नगरकर)
ग्रंथपाल
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६२०८


प्राचार्य
( डॉ. प्रो. एस. डी. पाटील)
PRINCIPAL
DOODHSAKHAR MAHAVIDYALAYA,
BIDRI, TAL. KAGAL, DIST. KOLHAPUR

## दि. 1 ते 15 जानेवारी 2025 दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शन:






**दि. 1जानेवारी 2025 “वाचन कौशल्य कार्यशाळा व पुस्तकाचे सामूहिक वाचन”:**



दूधसाखर महाविद्यालय बिद्री

“वाचन संकल्प महाराष्ट्राचा”

**“वाचन कौशल्य कार्यशाळा व पुस्तकाचे सामूहिक वाचन”**

दि. ०१/०१/२०२५

<u>कार्यक्रम पत्रिका</u>

स्वागत व प्रास्ताविक : डॉ. प्रदीप कांबळे

उद्घाटन : मा. प्राचार्य डॉ. संजय पाटील

मार्गदर्शक - डॉ. एस. ए. साळोखे (Subject – Reading Skills)

सामूहिक वाचन - पुस्तक - श्यामची आई

अध्यक्षीय मनोगत - मा. प्राचार्य

आभार - सहा. प्रा. संपदा वारके

सूत्रसंचालक - सहा. प्रा. डॉ. सुहानी पाटील

*******


दूधसाखर महाविद्यालय बिद्री
वाचन संकल्प महाराष्ट्राचा
2025.01.01 12:02


Definition of Reading Skills
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2025-01-01(Wed) 11:20(am)
27°C
81°F


Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
27°C
81°F
2025-01-01(Wed) 11:41(am)
Google


दूधसाखर महाविद्यालय बि
महाराष्ट्राचा
सामूहिक वाचन
डॉ. एस. ए. साळोखे
1/2025


Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2025-01-01(Wed) 11:39(am)
27°C
81°F


दूधसाखर महाविद्यालय बिद्री
Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2025-01-01(Wed) 11:39(am)
27°C
81°F

**दि. 02 जानेवारी 2025 “स्थानिक लेखक परिसंवाद व नवसाहित्याची ओळख”:**

दूधसाखर महाविद्यालय बिद्री

“वाचन संकल्प महाराष्ट्राचा”

# “स्थानिक लेखक परिसंवाद व नवसाहित्याची ओळख”

दि. ०२/०१/२०२५

**कार्यक्रम पत्रिका**

उद्घाटन - सर्व मान्यवरांच्या हस्ते

प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख: डॉ. प्रदीप कांबळे

मार्गदर्शन - डॉ. शिवाजी देसाई

अध्यक्षीय मनोगत - मा. प्राचार्य डॉ. संजय पाटील

आभार - सहा. प्रा. डॉ. वैशाली कांबळे

सूत्रसंचालक - सहा. प्रा. सुहानी पाटील

*******

दूधसाखर महाविद्यालयात माझी साहित्यनिर्मिती या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रा. शिवाजी देसाई विचारमंचावर प्राचार्य डॉ. संजय पाटील नॅक समन्वयक डॉ. एस. जी. खानापुरे, ग्रंथपाल अतुल नगरकर.

साहित्य म्हणजे जीवनाचा आरसा: प्रा.शिवाजी देसाई

बिद्री.साहित्य म्हणजे प्रत्येक माणसाच्या जीवनाचा आरसा असतो.आपल्या आयुष्यात किंवा आजूबाजूच्या समाजात ज्या घटना घडतात त्या तो बघतो आणि आपल्या साहित्यात संवेदनशीलतेने वास्तवाने मांडतो. या निवडक घटना वाचकांना आवडल्या की ते साहित्य लोकप्रिय होते. म्हणून प्रत्येकाने आपल्या जीवनातील निवडक साहित्याची मांडणी केली पाहिजे असे प्रतिपादन कर्मवीर हिरे महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्रा. शिवाजी देसाई यांनी केले. निमित्त होते दूधसाखर महाविद्यालयात आयोजित केलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अंतर्गत नवोदित लेखकांशी संवाद या कार्यक्रमाचा.यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी साहित्य लेखनासंबंधी संवाद साधला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना साहित्य लेखनासंबंधी मार्गदर्शन करताना साहित्याची मूलभूत तत्वे समजावून सांगितली. यावेळी विचार मंचावर ग्रंथपाल अतुल नगरकर,नॅक समन्वयक डॉ .एस.जी.खानापुरे प्रमुख उपस्थित होते.कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तविक डॉ. प्रदीप कांबळे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.सुहानी पाटील यांनी केले.आभार प्रा.डॉ.वैशाली कांबळे यांनी मानले.




C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2025-01-02(Thu) 11:20(am)
27°C
81°F
Doodhsakhar
College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google

**तरुण भारत**

**शनिवार, ४ जानेवारी २०२५**

# साहित्य म्हणजे जीवनाचा आरसा

- **प्रा.शिवाजी देसाई यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी
सरवडे

साहित्य म्हणजे प्रत्येक माणसाच्या जीवनाचा आरसा असतो. आपल्या आयुष्यात किंवा आजूबाजूच्या समाजात ज्या घटना घडतात त्या तो बघतो आणि आपल्या साहित्यात संवेदनशीलतेने वास्तवाने मांडतो. या निवडक घटना वाचकांना आवडल्या की ते साहित्य लोकप्रिय होते. म्हणून प्रत्येकाने आपल्या जीवनातील निवडक साहित्याची मांडणी केली पाहिजे, असे प्रतिपादन कर्मवीर हिरे महाविद्यालयाचे प्रा. शिवाजी देसाई यांनी केले.

बिद्री येथील दूधसाखर महाविद्यालयात आयोजित केलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अंतर्गत नवोदित लेखकांशी संवाद या कार्यक्रमात देसाई बोलत होते.



**बिद्री : दूध साखर महाविद्यालयात बोलताना प्रा. शिवाजी देसाई.**

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी साहित्य लेखनासंबंधी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय पाटील होते.

यावेळी अतुल नगरकर, डॉ. एस. जी. खानापुरे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमास प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत व प्रास्तविक डॉ. प्रदीप कांबळे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सुहानी पाटील यांनी केले. प्रा. डॉ. वैशाली कांबळे यांनी आभार मानले.

## दि. 06 जानेवारी 2025 लेखक व विद्यार्थी वाचन संवाद:

Date 06/01/2025, **लेखक व विद्यार्थी वाचन संवाद कार्यक्रम संपन्न.**

**लेखक श्री. विजय पाटील**

**गाव- कसबा वाळवे, सध्या वास्तव्य कोल्हापूर येथे, यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.**

दूधसाखर महाविद्यालय बिद्री

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

# "स्थानिक लेखक परिसंवाद व नवसाहित्याची ओळख"

दि. ०२/०१/२०२५

## कार्यक्रम पत्रिका

उद्घाटन - सर्व मान्यवरांच्या हस्ते

प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख: डॉ. प्रदीप कांबळे

मार्गदर्शन - डॉ. शिवाजी देसाई


अध्यक्षीय मनोगत - मा. प्राचार्य डॉ. संजय पाटील

आभार - सहा. प्रा. डॉ. वैशाली कांबळे

सूत्रसंचालक - सहा. प्रा. सुहानी पाटील

*******


दूधसाखर महाविद्यालय बिद्री
"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
लेखक-विद्यार्थी वाचन संवाद
नवलेखक – श्री. विजय पाटील
दि. 06/01/2025
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.


दूधसाखर महाविद्यालय बिद्री
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.


C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2025-01-06(Mon) 11:58(am)
28°C
82°F
Doodhsakhar College, Bidri
दूधसाखर कॉलेज, बिद्री
Google

**दि. 16 जानेवारी 2025 पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा:**

दूधसाखर महाविद्यालय बिद्री

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा 2025"

## "पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा"

दि. १६/०१/२०२५

**कार्यक्रम पत्रिका**

स्वागत व प्रास्ताविक: सहा. प्रा. अतुल नगरकर

कथन स्पर्धा - विद्यार्थी स्पर्धक

निकाल जाहीर - पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा

अध्यक्षीय मनोगत - मा. प्राचार्य डॉ. संजय पाटील

आभार - सहा. प्रा. डॉ. वैशाली कांबळे

सूत्रसंचालक - सहा. प्रा. सुहानी पाटील

*******

पुस्तक परीक्षण निकाल — पुस्तकाचे नाव

(1) स्नेहल युवराज पोवार - B.Sc.I - श्यामची आई ✓

(2) गौरी रंगराव सुतार - B.Sc.I - पणतीला जपताना - समीर देशमुख

(3) समृद्धी रघुनाथ परीट - B.Sc.I - श्यामची आई ✓

[सहभागी - समीक्षा आदमापुरे, समृद्धी आनंदा पाटील, वृषाली विजय पताडे, मधुरा पाटील, अंजली मांगोरे यांनी सहभाग नोंदविला.]

# पुस्तक परीक्षण स्पर्धा

दि.01/01/2025

नियम व अटी:

- कोणत्याही एका पुस्तकाचे परिक्षण करावे.
- ही स्पर्धा लिखित पद्धतीने होणार आहे.
- शब्द मर्यादा 1000 शब्द
- दि. 14/01/2025 संध्याकाळी 4.00 वाजेपर्यंत ग्रंथपाल नगरकर सर यांचेकडे जमा करावे.

निकष:

- शीर्षक
- आशय
- वाचकाचे मत

# कथन स्पर्धा

नियम व अटी

- ही स्पर्धा मौखिक पद्धतीने होणार आहे.
- सादरीकरण कमीत कमी 5 तर जास्तीत जास्त 7 मिनीटापर्यंत होईल.
- ही स्पर्धा दि. 16 /01/2025 सकाळी 11.00 वाजता ICT Hall येथे होईल.

निकष:

- शीर्षक
- आशय
- प्रेक्षकांचा प्रतिसाद
- सादरीकरण (Presentation)
- एकूण परिणाम

ग्रंथपाल
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६२०८

प्राचार्य
दूधसाखर महाविद्यालय,
बिद्री (मौनीनगर),
ता. कागल. जि. कोल्हापूर


दूधसाखर महाविद्यालय बिद्री
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2025-01-16(Thu) 12:19(pm)
29°C
84°F
Doodhsakhar College, Bidri
Google


दूधसाखर महाविद्यालय बिद्री
"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
C4GX+HF2, Bidri, Maharashtra 416208, India
Bidri
Maharashtra
India
2025-01-16(Thu) 12:16(pm)
29°C
84°F
Doodhsakhar College, Bidri
Google




**पुस्तक परीक्षण स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक काढण्यात आले त्यांचे पुस्तक परीक्षण खालीप्रमाणे आहे:**

**पुस्तक परीक्षण - प्रथम क्रमांक - स्नेहल युवराज पवार - B.Sc. 1**

**(मोबाइल नंबर - 9699647274)**

नाव :- स्नेहल युवराज पोवार.
वर्ग :- B.Sc-1.

प्रथम क्रमांक

09/10

GoodLuck Page No. (9)

Date

मी वाचलेल्या प्रेमळ व संस्कारात्मक अशा पुस्तकाचे नाव :- श्यामची आई ह्या पुस्तकाचे लेखक :- सानें गुरुजी

ह्या पुस्तकातून मला आवडलेला संदर्भ पुढीलप्रमाणे :-

" श्यामची आई " हे पुस्तक साने गुरुजी उर्फ पांडुरंग सदाशिव साने यांनी लिहलेले आहे. हे पुस्तक आत्मकथनात्मक पुस्तक आहे. हे पुस्तक त्यांच्या बालपणींच्या आठवणींवर आधारित असून त्यांच्या आईच्या महान त्यागाचे आणि सुसंस्कारांचे प्रभावी चित्रण करते. साने गुरुजींच्या लेखणीतून आईच्या निस्सीम प्रेमाची, त्यागाची आणि कर्तव्य भावनेची अप्रतिम कहानी उलगडते. श्यामचे बालपण गरिब पण संस्कारक्षम कुटुंबात घडले. श्यामच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत कठीण असते. वडील फारसे शिकलेले नसल्याने त्यांना रोजगार योग्य मिळत नाही. या परिस्थितीत श्यामची आई कुटुंबाची सर्व जबाबदारी सांभाळते. ती कष्टाळू, संयमी आणि त्यागशील स्वभावाची आहे. श्यामच्या आईने आयुष्यातील सर्व दुःख आणि त्रास सहन करूनही आपल्या मुलांना चांगले संस्कार दिले.

श्यामची आई हे पुस्तक केवळ आईच्या ममतेची गोष्ट नाही तर तिच्या नैतिकता, समाजसेवा आणि कर्तव्यपालनाचेही उत्कृष्ट उदाहरण आहे. ती आपल्या मुलांना कष्ट करण्याचे महत्त्व शिकवते. आणि त्यांना कधीच निराश होऊ देत नाही. श्यामच्या आईने त्याला सत्य, अहिंसा आणि प्रामाणिकपणाचे धडे दिले. ती श्यामला नेहमी इतरांची मदत करण्यास प्रेरित करते. श्यामची आई नेहमी देवावर श्रध्दा ठेवून, कष्ट आणि त्यागाची शिकवण देते. पुस्तकात अनेक प्रसंगांमध्ये आईच्या कर्तुत्वाचा उल्लेख आहे. श्यामला शाळेत पाठवण्यासाठी ती कष्टाने पैसे साठवते. आणि त्याच्या शिक्षणाची पूर्ण जबाबदारी उचलते. श्यामच्या आईचे ध्येय स्पष्ट असते की, आपल्या मुलांना चांगले संस्कार देणे आणि त्यांना उत्तम व्यक्ती बनवणे. आईच्या त्यागामुळे श्यामच्या मनात तिच्याविषयी अपार प्रेम निर्माण होते. ती श्यामच्या प्रत्येक निर्णयांमध्ये त्याला योग्य मार्गदर्शन करते आणि त्याला सदाचरणाचे धडे देते. श्यामच्या आईने तिच्या आयुष्यात अनेक संकटे सहन केली, पण तिच्या मुलांच्या शिक्षणात आणि विकासात तिने कधीच

Goodluck

GoodLuck Page No.
Date

कमीपणा येऊ दिला नाही.

पुस्तकाचा शेवट अत्यंत भावनिक आहे. श्यामची आई आजारी पडते आणि अखेरीस तिचे निधन होते. तिच्या निधनानंतर श्यामच्या जीवनात एक मोठी पोकळी निर्माण होते. पण तिच्या शिकवणुकीने तो आपले जीवन सत्कारणी लावतो. आईच्या आठवणी त्याला नेहमीच प्रेरणा देतात. "श्यामची आई" हे पुस्तक एक आदर्श आईचे चित्रण करते. या पुस्तकातून साने गुरुजींनी त्यांच्या आईवर असलेले अपार प्रेम, आदर, आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे. भारतीय समाजातील आईच्या भूमिकेचा गौरव करताना, गुरुजींनी तिला नवी ओळख दिली आहे. "श्यामची आई" हे पुस्तक केवळ साहित्यिक दृष्टिकोनातून नव्हे, तर नैतिक मूल्ये, संस्कार आणि समाजसेवेच्या दृष्टीकोनातूनही महत्वाचे आहे. त्यामुळे हे पुस्तक भारतीय साहित्यातील एक अमूल्य रत्न मानले जाते. जसा मला ह्या पुस्तकातून अनेक चांगला संदर्भ मिळाला. तसेच श्यामची आई हे पुस्तक अनेकांनी वाचून त्यातील चांगले गुण व काही चांगल्या गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत.

श्यामची आई ह्या पुस्तकाचा आशय :-

"श्यामची आई" हे साने गुरुजींनी लिहिलेले पुस्तक आहे. जे 1955 मध्ये प्रकाशित झाले आहे. ही मराठीतील एक आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे जी आई आणि तिच्या मुलाबद्दल हृदयस्पर्शी कथा सांगते. ग्रामीण महाराष्ट्रातील हे पुस्तक आपल्याला लेखकाच्या आई श्यामच्या जीवनातील प्रवासात घेऊन जाते आणि तिचे अथांग प्रेम, त्याग आणि सामर्थ्य दाखवते. श्यामची आई हे पुस्तक वाचताना लक्षात आले की, त्याचे आईप्रती अपार प्रेम तर होतेच पण मित्र-मंडळी सोबत असलेला स्नेह सुध्दा अपार होता. यातून आईने आपल्या मूलावर कसे संस्कार केले पाहिजेत हे श्यामच्या आई वरुन लक्षात येते. "श्यामची आई" मातृत्वाचे सार सुंदरपणे शोधते. श्यामची आई प्रेम, निस्वार्थीपणा आणि त्यागाचे शुध्द स्वरुप दर्शवते. तिचा अटळ पाठिंबा श्यामच्या व्यक्तिरेखेला आकार देतो आणि त्याच्या आयुष्यावर कायमचा प्रभाव टाकतो. सामाजिक बांधिलकी कशी जोपासली व मानवतावाद हाच खरा धर्म ही तत्वे लक्षात येतात.

Goodluck

GoodLuck | Page No. | Date

स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांची जाणीव होते. श्यामची आई त्या पुस्तकाची साधारण किंमत रु १२५ इतकी आहे. श्यामची आई हे नाव जरी ऐकले तरी उर भरून येतो त्यामागचे कारण म्हणजे त्यांचे आईप्रती असलेले प्रचंड प्रेम. प्रेमाने जवळ घेणे हे सर्व एका आदर्श मातेचीच लक्षणे आहेत. श्यामवर त्याच्या वडिलांचाही चांगलाच धाक होता. त्याचा लहान भावावर असलेला स्नेह सुध्दा खूप काही शिकवून जातो. मिळालेल्या पैशातून बचत करून लहान्यासाठी सदरा घेणे, आईची तब्येत बरी नसताना लाज न बाळगता झाडाला प्रदक्षिणा घालून पूर्ण करणे, वडिलांच्या धाकापोटी सर्व खरे सांगून टाकणे अशी हि श्यामची हि श्यामची वागणूक आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे. मातृ, पितृ, बंधूप्रेम तसेच मित्रप्रेम हि यात दिसून येते. श्यामची आई हे पुस्तक मराठी साहित्याच्या वैभवशाली परंपरेत एक मौल्यवान रत्न मानले जाते. साने गुरुजींनी या पुस्तकात यांच्या आयुष्यातील बालपणाचे आणि त्यांच्या आईचे आठवणीशिल्प शब्दबद्ध केले आहे.

पुस्तकात श्याम या लहान मुलाचे आणि त्याच्या आईचे नाते उलगडले आहे. श्यामच्या आईची माया, तिचे त्याच्याबद्दलचे शिक्षणाचे आणि संस्कारांचे तत्वज्ञान, तसेच तिच्या कष्टाळू स्वभावाची प्रेरणादायी कथा या पुस्तकात प्रभावीपणे मांडली आहे. आईच्या मुलांवर असलेल्या निस्सीम प्रेमाची आणि त्यागाची अद्वितीय कहाणी यातून उभी राहते. श्यामची आई ही केवळ आई म्हणून नव्हे, तर एक मार्गदर्शिका, शिक्षक, आणि स्नेही म्हणूनही वाचकांच्या मनाला भावते. तिच्या साध्या परंतु मर्मभेदी शिकवणींनी श्यामला जीवनातील उच्च मूल्यांची ओळख करून दिली. या पुस्तकातील साधी भाषा, स्वाभाविक संवाद, आणि हृदयाला भिडणारी भावनिक कथा वाचकांना मंत्रमुग्ध करते. "श्यामची आई" हे पुस्तक मला नेहमी जीवनातील महत्त्वाचे मूल्य, प्रेम, त्याग, आणि कुटुंबीयांबद्दलची निष्ठा यांची जाणिव करून देते. ही कथा केवळ एका आईच्या जीवनाचा आरसा नसून प्रत्येक वाचकाच्या मनाला विचार करायला भाग पाडते. त्यामुळेच हे पुस्तक माझ्या हृदयात विशेष स्थान मिळवून आहे.

Goodluck

GoodLuck Page No. Date

पुस्तके ही आपल्या जीवनाची अमूल्य संपत्ती आहेत. ती आपल्याला नवा दृष्टिकोन, नवे विचार आणि सकारात्मक जीवन जगण्याची प्रेरणा देतात. अनेक उत्कृष्ट पुस्तकांच्या सोबतीने मी माझ्या विचारांना बळकटी दिली आहे. परंतु त्यापैकी एक पुस्तक, ज्याने मला अत्यंत भावनिक आणि मानसिक पातळीवर प्रभावित केले, ते म्हणजे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांनी लिहिलेले "श्यामची आई". हे पुस्तक साने गुरुजींनी त्यांच्या स्वतःच्या जीवनातील काही आठवणींवर आधारित लिहिले आहे. हे पुस्तक त्यांच्या आईच्या जीवनमूल्यांवर आधारित असून, आईचे आपल्या मुलावर असलेले प्रेम, तिच्या शिकवणी आणि त्याग यांचे सुरेख चित्रण आहे. श्याम हा लेखक स्वतःच आहे, आणि या पुस्तकातील प्रत्येक प्रसंगात आईचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

पुस्तकातील अनेक प्रसंग हृदयस्पर्शी आहेत. एकीकडे श्यामच्या आईने त्याला सचोटी, प्रामाणिकपणा, आणि दयाळूपणाचे धडे दिले, तर दुसरीकडे तिने स्वतःच्या सुखाचा त्याग करून मुलाचे भविष्य घडवले. एक प्रसंग असा आहे की श्यामने आपल्या मित्राला तोडलेले आंबे दिले, आणि त्याच्या आईने त्याला समजावले की दुसऱ्याच्या मालमत्तेचा आदर करणे किती महत्त्वाचे आहे. या प्रसंगातून नीतिमूल्यांचा धडा शिकवण्याची आईची पद्धत खूपच प्रेरणादायी आहे. साने गुरुजींची लेखनशैली साधी, पण हृदयाला भिडणारी आहे, त्यांच्या लिखाणातून एक प्रेमळ आणि संवेदनशील मनाचा परिचय होतो. त्यांची भाषा ओघवती आहे, आणि त्यांनी वापरलेले शब्द व वाक्यरचना वाचकाच्या हृदयावर परिणाम करतात. वाचताना प्रत्येक प्रसंग डोळ्यांसमोर जिवंत होतो. "श्यामची आई" हे पुस्तक प्रत्येकाने एकदा तरी वाचावे. आईचे आपल्या जीवनातील स्थान, तिच्या शिकवणीचे महत्त्व आणि तिच्या कष्टांची जाणीव करून देणारे हे पुस्तक मनाला सकारात्मक विचारांची प्रेरणा देते.

Goodluck

श्यामची आई या कथेचा सारांश पुढीलप्रमाणे :-

"श्यामची आई" ही मुख्य पात्र श्यामने त्याच्या आईसोबतच्या त्याच्या बालपणाबद्दल सांगितलेली कथा आहे. ही कथा महाराष्ट्रातील एका छोट्या गावात उलगडते, जिथे श्याम त्याच्या प्रेमळ आईसोबत वाढतो. त्यांचे साधे जीवन असूनही, श्यामची आई त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करते आणि तिला स्वतःच्या अनुभवातून जीवनाचे महत्त्वाचे धडे शिकवते. पुस्तक वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये विभागले गेले आहे, प्रत्येक अध्यायात श्यामच्या आयुष्यातील वेगवेगळे टप्पे आणि त्यांच्यासमोरील आव्हाने दाखवली आहेत. एक तरुण विधवा म्हणून तिच्या संघर्षापासून ते आपल्या मुलाला शिक्षण देण्याच्या तिच्या निर्धारापर्यंत, श्यामची आई अविश्वसनीय शक्ती आणि लवचिकता दर्शविते. ती श्यामला प्रामाणिकपणा, नम्रता आणि सहानुभूती यासारखी मूल्य शिकवते आणि त्याला जबाबदार आणि दयाळू व्यक्ती बनवते.

1. मातृत्व :- "श्यामची आई" मातृत्वाचे सार सुंदरपणे शोधते. श्यामची आई प्रेम, निस्वार्थीपणा आणि त्यागाचे शुद्ध स्वरूप दर्शविते. तिचा अटळ पाठिंबा श्यामच्या व्यक्तिरेखेला आकार देतो आणि त्याच्या आयुष्यावर कायमचा प्रभाव टाकतो. हे पुस्तक आईच्या प्रेमाची सार्वत्रिक शक्ती साजरे करते आणि ते मुलाच्या जीवनाला कसे आकार देऊ शकते. हे दाखवते.

२. सामर्थ्य आणि चिकाटी :- कादंबरी आव्हानांवर मात करण्यासाठी सामर्थ्य आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित करते. श्यामच्या आईला अनेक संकटांचा सामना करावा लागतो परंतु आपल्या मुलाला चांगले जीवन देण्याचा दृढनिश्चय कायम असतो. तिचा अविचल आत्मा कधीही हार न मानण्याची प्रेरणा आहे.

3. ग्रामिण जीवनातील वास्तव :- "श्यामची आई" 20 व्या शतकाच्या सुरुवातीच्या महाराष्ट्रातील ग्रामिण जीवनाच्या वास्तवावर प्रकाश टाकते. या पुस्तकात ग्रामिण समाजाला करावा लागणारा संघर्ष, गरिबीची आव्हाने आणि शिक्षण आणि संधींची मर्यादित उपलब्धता यांचे चित्रण करण्यात आले आहे. हे सामाजिक असमानता आणि शिक्षणाच्या सामर्थ्याबद्दल महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करते.

4. शिक्षणाचे महत्त्व :- कादंबरीत शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. श्यामच्या आईला आपल्या मुलाचे जीवन सुधारण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व समजते. आर्थिक चणचण आणि सामाजिक दबाव असूनही ती त्याला शिकण्यास प्रोत्साहन देते.

Goodluck

GoodLuck | Page No.
Date / /

या पुस्तकात शिक्षणामुळे जीवन कसे बदलू शकते आणि गरिबीचे चक्र कसे मोडू शकते यावर भर दिला आहे.

लेखन शैली आणि प्रभाव :-

साने गुरुजींची "श्यामची आई" मधील लेखनशैली साधी पण प्रभावी आहे. त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण निसर्गाचे सुंदर वर्णन केले आहे, वाचकांना ते तिथे असल्याचा भास करून देतात. अस्सल पात्रे आणि त्यांच्या भावनांमुळे कथा संबंधित आणि हृदयस्पर्शी बनते. सर्व वयोगटातील वाचकांना आवडणारे हे पुस्तक मराठी साहित्यातील अभिजात ठरले आहे. प्रेम, त्याग आणि लवचिकता या सार्वत्रिक थीम वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील लोकांच्या हृदयाला स्पर्श करतात. "श्यामची आई" चे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे आणि ते भारतीय साहित्यातील सर्वात प्रिय पुस्तकांपैकी एक मानले जाते.

सर्व वयोगटातील वाचकांना आवडणारे हे पुस्तक मराठी साहित्यातील अभिजात ठरले आहे. प्रेम, त्याग आणि लवचिकता या सार्वत्रिक थीम वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील लोकांच्या हृदयाला स्पर्श करतात. "श्यामची आई" चे अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे आणि ते भारतीय साहित्यातील सर्वात प्रिय पुस्तकांपैकी एक मानले जाते. या कादंबरीचे रूपांतर एका यशस्वी मराठी चित्रपटातही करण्यात आले आहे, ज्यामुळे ही कथा व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचली आहे. हा चित्रपट पुस्तकाचे सार टिपतो, पात्रे आणि त्यांच्या भावना पडद्यावर जिवंत करतो.

निष्कर्ष :-

"श्यामची आई" ही मराठी साहित्यातील एक कालातीत कलाकृती आहे, जी आईचे प्रेम, सामर्थ्य आणि शिक्षणाच्या शक्तीच्या हृदयस्पर्शी चित्रणासाठी ओळखली जाते. साने गुरुजींचे कथाकथन आणि ज्वलंत पात्रे वाचायला भाग पाडतात. हे पुस्तक आपल्याला आईच्या प्रेमाचा मुलाच्या जीवनावर किती खोल परिणाम होऊ शकतो याची आठवण करून देते. "श्यामची आई" हे करुणा, दृढनिश्चय आणि मानवी आत्म्याचे सामर्थ्य या मूल्यांचे एक शक्तिशाली स्मरण आहे. या पुस्तकातून आईचे श्यामवरील प्रेम दिसून येते.

Goodluck

श्यामसाठी त्याची आई देवापेक्षा कमी नाही. तो जे काही आहे, त्याचे श्रेय आईला देतो. ती त्याला जे योग्य आहे. ते करायला शिकवते. या पुस्तकातील एक प्रसंग मला खूप आवडला. श्यामला पाण्याची भीती वाटते, म्हणून तो पाण्यात पोहणे टाळतो. श्यामला त्याचे मित्र भेकड म्हणून चिडवतात. आई कशी सहन करेल? श्यामची आई त्याला विहिरीपाशी नेते. जिथे तो शेवटी पोहायला शिकतो.

"श्यामची आई" पुस्तकाच्या मुखपृष्ठावर श्यामची आई, श्याम व त्याच्या मित्रांचे रंगीत, आकर्षक व सुंदर चित्र आहे. पुस्तकाची भाषा सोपी आहे. अक्षरांचा आकार योग्य आहे. प्रामाणिकपणा, माणुसकी, विविध संस्कार मुल्यांनी परिपूर्ण असे हे पुस्तक सर्वांनी वाचायला हवे.

* ह्या पुस्तकाबद्दलचे आपले मत व 'श्यामची आई' हे पुस्तक का आवडले :-

"खरा तो एकचि धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।" यांसारख्या काव्यपंक्तीतून आपल्याला मानवधर्म शिकविणाऱ्या साने गुरुजींचे संपुर्ण नाव - पांडूरंग सदाशिव साने असे होते. त्यांचा जन्म २४ डिसेंबर 1899 रोजी कोकणातील पालगड या गावी झाला. साने गुरुजी यांच्या आईचे नाव यशोदा, जेव्हा माझा जन्म झाला त्यावेळी आमची सांपत्तीक स्थिती खूपच बिकट होती. कोकणातल्या, पालगड या गावी आम्ही राहत होतो. माझ्या आईने माझ्यावर प्रेमाचे संस्कार केले, हे प्रेम माणसांवरचे होते. पशू, पक्षी, प्राणी, निसर्ग, झाडे - झुडपे, फुले यावरचे होते. तिने माझ्या अंत करणात जागविलेल्या प्रेमाला सीमा नव्हती. "श्यामची आई" हे पुस्तक वाचून मला माझ्या आईचे महत्त्व अधिक स्पष्टपणे जाणवले. तिचे कष्ट, तिच्या शिकवणी, आणि तिचे माझ्यावर असलेले निस्सीम प्रेम मी नव्याने अनुभवले. या पुस्तकात मला जीवनात प्रामाणिकपणा, कृतज्ञता, आणि नम्रता यांचे महत्त्व पटवून दिले.

GoodLuck | Page No. | Date

आई हे प्रत्येकाच्या जीवनातील पहिली गुरु आहे. ति प्रेम आणि संस्कार आपल्या आयुष्याला घडवतात. आपण आईच्या त्यागाचा सन्मान केला पाहिजे आणि तिला कधीही विसरु नये. "श्यामची आई" हे पुस्तक केवळ कथा नसून, ती एक शिकवण आहे. जिवनात नीतिमत्ता, प्रामाणिकपणा, कृतज्ञता आणि नम्रता यांचे महत्त्व पटवुन दिले. जीवनात ह्याळूपणा किती महत्त्वाचे आहेत, हे या पुस्तकातून कळते. आजच्या धावपळीच्या जीवनात आपण आईच्या त्यागाच्या आणि तिच्या शिकवणींचा विसर पडलो आहोत. हे पुस्तक आपल्याला त्या मूल्यांची जाणिव करुन देते. असे ह्या पुस्तकाचे महत्त्व आहे.

श्यामची आई हा त्याग, प्रेम, आणि सहन-शीलतेचे प्रतीक आहे. तिने अत्यंत हलाखीच्या परि-स्थितीतही आपल्या मुलाला योग्य शिक्षण दिले. तिचे मुलावर असलेले प्रेम निस्सीम आहे, परंतु तिच्या प्रेमाला शिस्त आणि योग्य विचारांची जोड आहे. ती श्यामला फक्त चांगला मुलगा नाही, तर चांगला माणूस बनवण्यासाठी सतत प्रयत्न करते. श्यामची आई हे पुस्तक आईच्या महत्त्वाची जाणीव करुन देणारे प्रेरणादायी साहित्य आहे. श्यामची आई हे पुस्तक आवडण्याची कारणे खुप काही आहेत. आई विषयी असणारी माया, प्रेम, जिव्हाळा, ममता ह्या सर्व गोष्टी दिसून येतात. आपली आई रागाने काही बोलली तरी डोक्यावरुन माये सारखा हात फिरवून जवळ घेते व आपल्याला जीव लावते. आपले सर्व गुन्हे आपली 'आई'चं माफ करु शकते. वेळेवर शाळेत पोचवणे, डबा तयार करणे, नीट नेटकी कपडे घालून आपले सर्व कामं आपली आई करु शकते. आई ह्या दोन शब्दांत खूप सामर्थ्य आहे. जसे साने गुरुजींच्या आईने त्यांच्या शि-क्षणासाठी अनेक कामे करुन त्यांना शाळेत पाठवून दिले, तसेच आपण देखील आपल्या आईचा आदर व दिवस-रात्र ती कष्ट करते व आपल्यासाठी सगळी धावपळ करुन

Goodluck

करते. आपली
आपल्याला चांगल्या सवयी आत्मसात आई - वडीलांना
आई प्रमाने इतर मुला- मुलींच्या हे पुस्तक आ-
आदराने बोलवणे राखले पाहिजे. म्हणजे मातीचा
पत्याला आवडण्याची कारणे - लहान मूल संस्कार करून
गोळा ! श्यामवर त्याच्या आईने ममतेने श्यामच्या
श्यामचे मानवतावादी व्यक्तिमत्त्व घडवले. अंगिकारावा ही
आईचा या श्यामचा आदर्श प्रत्येकाने ती प्रिय
शिकवण ही कादंबरी देते म्हणून जनमानसात
आहे. त्याच्या

पुष्कळ वेळा मनुष्याचा मोठेपणा बरे- वाईट
आईबापांवर अवलंबून असतो. त्याचे पुढचे बऱ्या-
ईवन त्याच्या आईबापांवर अवलंबून असते. त्याच्या पाळण्यात
वाइटाचा पाया लहानपणीच भरला जात असतो. पुढील
असतानाच, आईच्या अंगाखांद्यावर खेळत असतानाच, मोठेपणा
जीवनाच्या विकासाचे बी पेरले जात असते. आपले
याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठांवर हिमा-
नाव काही काळ नाचणे, असा मी करीत नाही.
लयाच्या दऱ्याखोऱ्यांत असे प्रचंड व गगनचुंबी वृक्ष
असतील, की ज्यांची नावे जगाला माहीत नाहीत;
रानावनांतील कानाकोपऱ्यात असे एखादे रमणीय व सुगंधी
फूल फुललेले असेल, की, ज्याचा पत्ता कोणाला
लागलेला नाही. समुद्राच्या पोटात अशी गोलबंद व
पाणीदार मोत्ये असतील; परंतु मानवजातीस त्यांचे अद्यापि
दर्शन नाही. वर अनंत आकाशात असे अनंत तारे
असतील, की जे पल्लेदार दुर्बिणीतूनही अजून दिसले
नाहीत, मोठेपणा याचा अर्थ जगाला माहीत असणे,
असा मी करीत नाही. मी निर्दोष होत आहे, हळूहळू
उन्नत होत आहे. ही ज्याला जाणिव आहे, तो मोठाच
होत आहे. मोठा होत जाण्याची ही प्रवृत्ती व्यक्तीच्या
ठिकाणी आईबापच उत्पन्न करितात. आईबापांकडून मिळालेली
ही ईश्वरी देणगी होय. मायबापच कळत वा नकळत
मुलाला लहान किंवा मोठा करीत असतात. आईच्या
पोटातच मुली जीव राहिला, आईशी एकरूप होऊनच
जीव बाहेर पडला; जणू तिचाच होऊन बाहेर आला.
आईची माया ही फार वेगळीच असते.

GoodLuck Page No.
Date

* श्यामची आई हे पुस्तक आपल्याशी निगडित करा व आपल्याला मिळालेले चांगले गुण पुढील प्रमाणे

'श्यामची आई' हे पुस्तक मला वाचायला खूप आवडले मी हे पुस्तक वाचत असताना मला कोण-ताही अडथळा आला नाही. हे पुस्तक मी अगदी मनापासून वाचले आहे. आई विषयी असलेले प्रेम, ममता, जिव्हाळा व काळजी ह्या सर्व मा-येच्या गोष्टी दिसून येतात. जसे की साने गुरुजींना त्यांचे आई चांगले वळण लावले व चांगल्या मित्रांची संगत करायला लावली. आई वेळोवेळी मुलांना मोठं करत योग्य दिशा दाखवत असते. त्याला ती सुसंस्कृत बनवत असते. खरंतर आई गुरुजीनची भूमिका पार पाडत असते. मुलांवर चांगले संस्कार करून, त्यांचे समाजात एक चांगलं व्यक्तिमत्त्व घडविण्यात ती यशस्वी होत असते. अशीच एक यशस्वी आई म्हणजे "सानेगुरुजींची आई" म्हणजेच श्यामची आई.

त्यांचे श्यामची आई पुस्तक म्हणजे त्यांना त्यांच्या जीवनात आलेले अनुभव, त्यांच्या आयुष्यात घडलेले किस्से आणि यातुनच त्यांना आईने दिलेली शि-कवण. आईचे मोठेपण या पुस्तकात सानेगुरुजींनी अधोरेखित केलेले आहे. त्यांच्या अंगी सर्व गुण आहेत ती त्यांच्या आईने आत्मसात करून दिली आहेत. जसे साने गुरुजींच्या जीवनात अनेक प्रसंग आलेत तसेच माझ्याही जीवनात मी जगत असताना मला एक अडथळा आला, मी आठवीत शिकत असताना मला एक पुस्तकाची आवश्यकता होती. मी एका परीक्षेला बसायचे असे माझ्या घरी एक अडथळा आला होता. मला एक परीक्षेला बसायचे होते, तेंव्हा थोडी पैशाची कमतरता भासली होती. तेंव्हा माझ्या आईने कशाचाही न विचार करता मला फी भरण्यास पैसे दिले. माझी आई मला कोणत्याही परिस्थितीमध्ये माघार दिली नाही. आणि महत्त्वाचे म्हणजे शाळेच्याबाबतीत तरी

Goodluck

माझी मम्मी माझ्यासाठी
कधीच नाही म्हणाले नाहीत. मला ह्या पुस्तकातून पुढेच
खूप प्रिय आहे. मला ह्या पुस्तकातून मुला-मुलींनी
सांगायचे आहे की, प्रत्येक मुला तसेच ते आपल्या
आपल्या आई-वडीलांचे कष्ट ह्याची जाणिव ठेवून आपण
साठी किती राबतात. ह्याची जाणिव ठेवून करायला हवे.
आपल्या आई-वडीलांचे नाव उज्जवल गोष्टींनी व
श्यामची आई हे पुस्तक खूप चांगल्या गोष्टींनी व
आईचा प्रेमळपणा ह्यावर आधारित आहे.
श्यामची आई म्हणजेच यशोदा माता ह्या
मातेने श्यामला अनेक गोष्टी शिकवल्या आहेत.
व चांगले आयुष्य जगायला लावले. मी श्यामची आई
हे पुस्तक वाचले आहे. साने गुरुजी त्यांच्या घरची
परिस्थिती खूप गरिबीची होती, तरीही त्यांनी यश,
चिकाटी सोडली नाही. आपली आई आपल्या मु-
लांना नेहमी चांगली शिकवूक देत असते. हे पुस्तक
आई व श्याम ह्या दोन व्यक्तीवर अवलंबून आहे.
हे पुस्तक वाचल्यानंतर समजते की, श्यामची घरची परि-
स्थिती हालाकिची होती त्यामुळे त्यांना त्यांच्या
घरची परिस्थिती बिकट असल्यामुळे त्यांना त्यांच्या
यशाची जाणिव आली. आपली आई एक दिवस
जरी घरातून बाहेर गेली तर घर भिन्न-भिन्न
असते. श्यामच्या आई प्रमाणेच माझी आई देखील
माझी अशीच काळजी घेत असते. मी चांगली
शाळा शिकून मोठी व्हावी अशी माझ्या आईची
इच्छा आहे. माझ्या आईने मला कोणतीही गोष्ट
कमी पडू दिली नाही. प्रत्येक सुख-दुःखात मला
खंबीरपणे साथ द्यायला तयार असते. प्रत्येकाच्या
आईला वाटतं असतेच आपलं बाळ चांगली शाळा
शिकून मोठ्या पदावर नोकरी करत असावे त्याला
कोणताही धोका असायला नको सुखरूप घरी लव-
कर परत यावे. मी कॉलेजला गेल्यानंतर मला
घरी यायला थोडा उशिर झाला तरी माझी आई
दारात वाट बघत असते इतकी माझी आई प्रेमळ व
दयाळू देखील आहे माझी आई माझ्यासाठी खूप प्रिय
आहे. लाड पण तितकेच करते आणि मी तिचे सा-

शिकलेली कोणतीही एखादी गोष्ट ऐकली नाही तर थोडी चिडते, पण समजावून सांगते. मायेने जवळ घेते. अशी माझी आई श्यामच्या (साने गुरुजींच्या) आई प्रमाणे आहे. आपल्या आईने आपल्याला ९ महिने पोटात वाढवून आपला सांभाळ करते व चांगल्या सवयी अंगीकारण्यास स्वीकार करते अशी ही "माझी आई" ह्या स्पर्धेच्या युगात मला इतर कोणासाठी मोठे व्हायचे नाहीतर माझ्या आईसाठी मला माझे आयुष्य घडवायचे आहे. त्यासाठी कितीही कष्ट व अभ्यास करायला लागला तरी चालेल पण मी माझे भविष्य घडवण्यासाठी सदैव तत्पर असेन.

श्यामची आई हे पुस्तक प्रत्येकाने एकदा तरी वाचावे. आईचे आपल्या जीवनातील स्थान, तिच्या शिकवणींचे महत्त्व, आणि तिच्या कष्टांची जाणिव करून देणारे हे पुस्तक मनाला सकारात्मक विचारांची प्रेरणा देते. साने गुरुजींनी लिहिलेले हे साहित्य खऱ्या अर्थाने अमूल्य आहे. माझ्या आयुष्यात या पुस्तकाने मला नवी दिशा, स्थान, तिच्या शिकवणीचे महत्त्व आणि तिच्या कष्टांची जाणिव करून देणारे हे पुस्तक माझ्या मनाला सकारात्मक विचारांची प्रेरणा देते. मातेबद्दल असणारे प्रेम, भक्ति, व कृतज्ञता यांच्या अपार भावना 'श्यामची आई' या पुस्तकात मांडलेल्या आहेत. त्यांच्या साहित्यातून कळकळ स्नेह, प्रेम या गोष्टींवर भर आढळतो. माझ्या आयुष्यात या पुस्तकाने मला नवी दिशा दाखवून दिली आहे. खूप सारे प्रसंग व आईबद्दलचे प्रेम ह्या पुस्तकातून दिसून येते. हे पुस्तक अगदी बारीक नजरेने वाचल्यास ह्यातील सर्व संदर्भ कळून जातो. दुर्लक्ष करून हे पुस्तक वाचल्यास कोणतीही गोष्ट समजणार नाही. आपण जे काम करतो ते अगदी मनापासूनच करायचे असते. तसंच त्याचे चांगले फळ आपल्याला मिळते, म्हणूनच "श्यामची आई" हे पुस्तक माझे खूप आवडीचे पुस्तक आहे.

**पुस्तक परीक्षण - द्वितीय क्रमांक - गौरी रंगराव सुतार - B.Sc. 1 (मोबाइल नंबर - 7385897327)**

द्वितीय क्रमांक

नाव :- गौरी रंगराव सुतार
वर्ग :- BSC-I

★ शीर्षक - 'पळतीला जपताना'

★ पुस्तकाचे लेखक - 'समीर दरेकर'

★ आशय :-

'पळतीला जपताना' हे पुस्तक 'समीर दरेकर' यांनी प्रकाशित केलेले आहे. 'पळतीला जपताना' या पुस्तकामध्ये प्रेम, धर्मान्तर आणि बरेच काही सांगितले आहे.

भारत हा प्राचीन काळापासून मुलतःच शांतिप्रिय व सहिष्णु देश आहे. हिंदू समाज हा या देशाचा अधिष्ठानरूप समाज असून या समाजाने आपल्या स्वभावानुरूप अनेक अल्पसंख्य विदेशी समाजांना त्यांच्या पंथ व उपासना पद्धतीसह स्थान व मान दिला आहे. पण, 'जिहाद' नावाखाली पूर्वी तलवारीच्या जोरावर धर्मप्रसार करणाऱ्या धर्मांध मुस्लिमांनी आता 'लव्ह जिहाद'द्वारे हिंदू मुलींचे इस्लाम धर्मांतरण करण्याचे षडयंत्र रचले आहे. प्रेम, प्रेमविवाह हा व्यक्तिगत विषय आहे. पण, 'लव्ह जिहाद' भारताच्या सामाजिक स्वास्थ्याला सुरुंग लावणारा राष्ट्रीय प्रश्न आहे. हे आधार पुराव्यानुसार सिद्ध करून समाजाला जागृत करणारे नेत्रांजन म्हणजे समीर दरेकरांचे पुस्तक - 'पळतीला जपताना'... भारत देश हा अनेक प्रकारच्या विविधतेने नटलेला, संपन्न त्याचबरोबर प्राचीन देश आहे. अनेक भाषा, प्रांत, समाज, पंथ - संप्रदाय, चालीरिती, खाद्य, वेशभूषा अशी बहुविविधता हेच भारताचे पूर्वापार वैशिष्ट्य आहे. उदारता, सर्वसमावेशी सहिष्णुता ही भारतीय समाजाची जगभर ओळख आहे. पारशी, यहुदी अशा जगभर अपमानित झालेल्या अल्पसंख्य समाजाला सन्मानाने स्थान देणारा एकमेव देश म्हणून भारत विश्वप्रसिद्ध आहे. भारताचा हा पूर्वापार गौरव हा एका राष्ट्राचा गौरव आहे. 'एकम् सत विप्रा बहुधा वदन्ति' या भारतीय - हिंदू चिंतनाचा, तत्वविचारांचा तो गौरव आहे. पण, अलीकडे सर्वधर्मसमभावाचे चुकीचे अर्थ करीत दांभिक राजकारण्यांनी व पक्षांनी आपल्या स्वार्थासाठी - सत्तेसाठी मुस्लीम तुष्टीकरणाच्या लांगूलचालन धोरणाने नव्या सामाजिक - राष्ट्रीय स्वरूपाच्या अनेक आत्मघाती संकटांना जन्म दिला आहे. त्या अनेक संकटांपैकी

IKON | Page No.
Date / /

सध्या सर्वत्र चर्चिला जाणारा सामाजिक (राष्ट्रीय) प्रश्न म्हणजे लव्ह जिहाद !

अनेकांना या 'लव्ह जिहाद' प्रश्नाचे अद्याप गांभीर्यच समजलेले नाही, ही सर्वात मोठी खेदाची गोष्ट आहे. अनेक जण हा प्रश्न काही विशिष्ट हिंदुत्ववादी संस्था-संघटनांनी वाऊ केलेला विषय असे मानून दुर्लक्ष करतात, ही आणखी क्लेशकारक गोष्ट आहे. या अशा पार्श्वभूमीवर 'लव्ह जिहाद' चा विषय सांगोपांग, सविस्तर आणि सबळ पुराव्याच्या आधारे समजून घेण्यास समीर दरेकर यांचे 'प्रणतीला जपताना' हे पुस्तक झणझणीत नेत्रांजनासारखे आहे, असे मला वाटते. अभिनव निर्माण प्रकाशन पुणे, या प्रकाशन संस्थेने खास समाजजागृतीसाठी हे पुस्तक एक सामाजिक बांधिलकी म्हणून प्रकाशित केलेले आहे. आजवर गेल्या कित्येक वर्षात या पुस्तकाच्या १५+ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत, पण हे पुस्तक घरोघर वाचले जाण्याची व समाजात प्रणतीविषयी जागृती-दक्षता निर्माण होणे, ही काळाची गरज आहे. दरेकर हे 'बीई' पदवीधर असून त्यांचा सामाजिक प्रश्नांचा अभ्यास, त्यासंदर्भातील वाचन, व्यासंग दांडगा आहे. 'लव्ह जिहाद' प्रश्नांची त्यांनी ज्या पद्धतीने मांडणी केली व लेखन केले, ते त्यांच्या व्यासंगाचे व सामाजिक तळमळीचे उत्कृष्ट दर्शन आहे. आपण पुस्तकाच्या विषयाकडे कोणताही पूर्वग्रह न ठेवता पहा व प्रांजळपणे वाचन करा. मग तुम्हाला हा विषय तुम्ही समजता एवढा दुर्लक्ष करण्याचा नाही, हे तुमच्या लक्षात येईल व या विषयाचे सामाजिक-राष्ट्रीय महत्वही पटेल. कदाचित तुम्हीही या पुस्तकाचे प्रशंसक होऊन जनजागृतीमध्ये सहयोग द्याल असे मला वाटते.

प्रेम ही एक पवित्र व मंगल आनंददायी गोष्ट आहे. पण, या गोष्टीचा धर्मांध मुस्लीम गैरफायदा घेत आहेत व त्याद्वारे छुप्या पद्धतीने इस्लामचा धर्मप्रचार करीत आहेत. हे कटूसत्य सध्या आपल्या देशाचे वास्तव आहे. केरळचे माजी मुख्यमंत्री ओमेन चंडी यांनी एका जाहीर पत्रकार परिषदेत या 'लव्ह जिहाद' संकटाची माहिती दिली असून इ.स. २००६ ते २०१२ या सहा वर्षात केवळ एका केरळ प्रांतात ७,७१३ हिंदू मुलींचे 'लव्ह जिहाद' द्वारे धर्मांतर झाल्याचे सांगितले आहे. एवढेच नव्हे, तर जिल्हावार 'लव्ह जिहाद' ची आकडेवारीही दिली आहे. उच्च न्यायालय, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग भारत सरकार, बुद्धिस्ट असोसिएशन लडाख, अकाली दल अशा अनेकांनी या 'लव्ह जिहाद' च्या सामाजिक प्रश्नाकडे-संकटाकडे लक्ष वेधलेले आहे. त्यामुळे 'लव्ह जिहाद' हा केवळ हिंदुत्ववाद्यांचा कांगावा आहे, असे नसून तो एक जिवंत ज्वलंत राष्ट्रीय प्रश्न.

IKON Page No.
Date

संकट आहे. हे आता निर्विवाद स्पष्ट झालेले आहे. त्याविषयी सर्व बाजूंनी समजून घेण्यास देरेकरांचे 'पणतीला जपताना'. हे पुस्तक एखाद्या गाईड-सारखे आहे. देरेकरांनी पुस्तकाला अत्यंत समर्पक व सूचक नाव दिलेले आहे. 'पणतीला जपताना' या नावातून त्यांनी विषय नेमकेपणाने पोहोचविलेला आहे. हे पुस्तक त्यांनी मुस्लीम समाजातील सत्यशोधक समाजसुधारक हमीद दलवाई यांना व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अर्पण करून फार मोठे औचित्य दाखवले आहे. ३२४ पानांच्या या पुस्तकात देरेकरांनी 'प्रेम, धर्मांतर आणि बरेच काही!' या विषयाचा समग्र, सादयंत, साधार आणि सहानुभूतीने विचार केला आहे. त्यांची भूमिका मात्र सडेतोड आहे. आणि न्यायालयीन युक्तिवादाच्या धर्तीवर त्यांनी सर्व विषय वाचकांना समजेल, पटेल अशा पद्धतीने मांडलेला आहे.

* स्वतःचे मत :-

'पणतीला जपताना' या पुस्तकाचे लेखक 'समीर देरेकर' यांनी अत्यंत सोप्या, सरळ भाषेत आयुष्यात होणारे प्रसंग व्यक्त केलेले आहे. त्यांनी आपल्या हिंदू धर्माला जपण्याचे सांगितले आहे. देरेकरांनी 'लव्ह जिहाद' या घटकावर अत्यंत चांगल्या प्रकारे मत व्यक्त केलेले आहे. लेखक देरेकर यांचा प्रेमाला, प्रेमविवाहाला विरोध नाही. प्रेम आणि विवाह या वैयक्तिक - खासगी गोष्टी आहेत, हे त्यांना मान्य आहे, पण त्यांचा विरोध 'लव्ह जिहाद'ला आहे. कारण, या लव्हमागे प्रेमामागे मुस्लिम तरुणांची भावना पवित्र नसून फसवून मुलींचे इस्लाम धर्मात धर्मांतर करण्याची दुष्ट भावना आहे. त्या कामासाठी मुस्लीम युवकांना खास फंडिंग केले जाते. १६ छोटी - छोटी प्रकरणे आणि माहितीपूर्ण परिशिष्टे असे पुस्तकाचे एकूण स्वरूप आहे. 'फसलं पुस्तक आहे ना'? या धक्कादायक प्रश्नाच्या प्रकरणाने या पुस्तकाचा विषयारंभ होतो आणि 'फसव्या प्रेमातून धर्मांतर', 'लव्ह जिहाद', 'तपास यंत्रणा - न्यायालयाची मते', 'करुण कहाण्या', 'दावत - ए - इश्क - का - दावत - ए - धर्मांतर', 'शरीरसंबंध एक हत्यार', 'श्रद्धांचा कोंडमारा', 'इतिहास पाहा', 'लग्न करण्या आधी', 'फतव्यानुसार जगणार का?', 'दोन शब्द पालकांसाठी', 'मुलगी पळून गेल्यावर', 'माझ्याबातमीची खिडकी' या नावांच्या विविध प्रकरणातून एखाद्या शिक्षकाने समजावून द्यावे.

लग्नानंतर मुले होईपर्यंत मुस्लीम तरुण हिंदू पत्नीला

जोधा अकबरप्रमाणे वागवतो, पण मुले होताच धर्मांतराची सक्ती करतो, दबाव आणतो, प्रसंगी छळ करतो, 'तलाक'चे भय दाखवतो. मुस्लिमांना चार लग्नांची धार्मिक मुभा असल्याने त्या तरुणाचे या पत्नीविना काहीच अडत नसते. दरेकर समाजबांधव आंतरधर्मीय लग्नांना 'लव्ह जिहाद' म्हणत नाहीत, तेही लक्षात घ्यावे. अनेक मुस्लीम संस्थांनी 'लव्ह जिहाद'च्या हिंदू मुलींच्या इस्लाम धर्मांतराचे समर्थन करणाऱ्या पुस्तिका प्रकाशित केलेल्या आहेत. ऑनलाईन साहित्यही प्रसारित केलेले आहे. हे हिंदू पालक पाहू शकतात. आणि आपल्या घरातील, कुटुंबातील समाजातील 'ती'ला जपू शकतात. तुम्ही आई, बहीण, मैत्रीण, बाबा, भाऊ, मित्र वा नातेवाईक कोणीही असा तुम्हाला आपल्या जवळच्या 'ती'ला जपले पाहिजे; तिच्याच शाश्वत सुखासाठी. प्रेम-प्रेमविवाह हा खाजगी विषय असला, तरी 'लव्ह जिहाद' हा खाजगी विषय नसून सामाजिक व व्यापक अर्थाने राष्ट्रीय प्रश्न आहे. हे समजून घेण्यास उपयुक्त ठरणारे, सावध करणारे, आणि लढायला दक्ष-सज्ज करणारे पुस्तक म्हणजे "पणतीला जपताना..." 'अग्रमी पार्थास वा अंति परी तू जाणू दे!' असे एक गीत-पद्य प्रसिद्ध आहे. 'लव्ह जिहाद'च्या विषयाने संभ्रमित हिंदू समाजाला (पार्थाला) दरेकर यांनी 'पणतीला जपताना!..' पुस्तकाद्वारे गीताज्ञान दिलेले आहे. वाचा, समजून घ्या, इतरांना सांगा, सावध व्हा, दक्ष रहा!

—***—***—

**पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा - तृतीय क्रमांक - समृद्धी रघुनाथ परीट - B.Sc. 1 (मोबाइल नंबर - 9022778365)**

तृतीय क्रमांक

GoodLuck Page No.
Date

# श्यामची आई

नाव - समृद्धी रघुनाथ परीट
शाळेचे नाव - दूधसाखर महाविद्यालय बिद्री
इयत्ता - BSc (I)

07/10

- शीर्षक - "श्यामची आई"
- लेखक - 'साने गुरुजी'
- आशय - "श्यामची आई" हे साने गुरुजी उर्फ पांडुरंग सदाशिव साने यांनी लिहिलेले आत्मकथनात्मक पुस्तक आहे. हे पुस्तक त्यांच्या बालपणीच्या आठवणींवर आधारित असून त्यांच्या आईच्या महान त्यागाचे आणि सुसंस्कारांचे प्रभावी चित्रण करते. साने गुरुजींच्या लेखणीतून आईच्या निस्सीम प्रेमाची, त्यागाची आणि कर्तव्य भावनेची अप्रतिम कहाणी उलगडते. श्यामची आई पुस्तकाचे मुखपृष्ठ खूप सुंदर आहे. या पुस्तकाची किंमत सर्वांना परवडेल अशी आहे. फक्त ३० रु. आहे. या पुस्तकामध्ये दोन घरे दाखवली आहेत. व दोन मुले आणि एक मुलगी दाखवली आहे. आणि त्यांच्या आईचे पण चित्र रेखाटले आहे. त्याच्यां समोर तुळशी कट्टा पण दाखवला आहे. व एक मुलगा फुले गोळा करून घेवून आलेली आईला देत आहे. या पुस्तकात एकूण ४२ रात्री आहेत. प्रत्येक रात्र आपल्याला नवा संदेश देते. या पुस्तकाची भाषा खूप सोपी आहे आणि सर्वांना भाषा वाचता येईल अश्या भाषेचा उल्लेख केला आहे. श्यामची आई हे सानेगुरुजी यांची आत्मकथा आहे. या पुस्तकातून आपल्याला घरची परिस्थिती गरीबांची असूनही आई आपल्या मुलावर चांगले संस्कार करते हे आपल्याला समजून येते. एक आदर्श, होतकरु आणि प्रेमळ आई या पुस्तकातून सापडते. श्यामची आई हे लोकप्रिय पुस्तक असून ते त्या पुस्तकातून आपल्याला प्रेरणा देते. कथा ही श्याम या मुलाच्या भोवती फिरते. श्यामचे बालपण गरिब पण संस्कारक्षम कुटुंबात घडते. श्यामची कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत कठीण असते. वडील फारसे शिकलेले नसल्याने त्यांना रोजगार योग्य मिळत नाही. या परिस्थितीत श्यामची आई कुटुंबाची सर्व जबाबदारी सांभाळते. ती कष्टाळू, संयमी आणि त्यागशील स्वभावाची आहे. तिने आयुष्यातील आपल्या सर्व दुःख आणि त्रास सहन करूनही आपल्या मुलांना चांगले संस्कार दिले.

श्यामची आई हे पुस्तक केवळ आईच्या ममतेची गोष्ट नाही तर तिच्या नैतिकता, समाजसेवा, आणि कर्तव्यपालनाचेही उत्कृष्ट उदाहरण आहे. ती आपल्या मुलांना कष्ट करण्याचे महत्त्व शिकवते, आणि त्यांना कधीच निराश होऊ देत नाही. श्यामच्या आईने त्याला सत्य, अहिंसा, आणि प्रामाणिकपणाचे धडे दिले. ती श्यामला नेहमी इतरांची मदत करण्यास प्रेरित करते. श्यामची आई नेहमी देवावर श्रद्धा ठेवून, कष्ट आणि त्यागाची शिकवण देते. पुस्तकात अनेक प्रसंगांमध्ये आईच्या कर्तृत्वाचा उल्लेख आहे. श्यामला शाळेत पाठवण्यासाठी ती कष्टाने पैसे साठवते आणि त्याच्या शिक्षणाची पूर्ण जबाबदारी उचलते. श्यामच्या आईचे ध्येय असे स्पष्ट होते की आपल्या मुलांना चांगले संस्कार आणि त्यांना उत्तम व्यक्ती बनवणे. आईच्या त्यागामुळे श्यामच्या मनावर तिच्याविषयी अपार प्रेम निर्माण होते. श्यामच्या प्रत्येक निर्णयांमध्ये त्याला योग्य मार्गदर्शन करते आणि त्याला सदाचरणाचे धडे देते. श्यामच्या आईने तिच्या आयुष्यात अनेक संकटे सहन केली, पण तिच्या मुलांच्या शिक्षणात आणि विकासात तिने कधीच कमीपणा येऊ दिला नाही. पुस्तकाचा शेवट अत्यंत भावनिक आहे. श्यामची आई आजारी पडते आणि तिचे निधन होते. तिच्या निधनानंतर श्यामच्या जीवनात खूप काही निर्माण होते, पण तिच्या शिकवणुकीने तो आपले जीवन सत्कारणी लावतो. आईच्या आठवणी त्याला नेहमीच प्रेरणा देतात. "श्यामची आई" हे पुस्तक एक आदर्श आईचे चित्रण करते. या पुस्तकातून साने गुरुजींनी त्यांच्या आईवर असलेले अपार प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे. भारतीय समाजातील आईच्या भूमिकेचा गौरव करताना, गुरुजींनी तिला नवी ओळख दिली आहे. "श्यामची आई" हे पुस्तक केवळ साहित्यिक दृष्टिकोनातून नव्हे, तर नैतिक मूल्ये, संस्कार, आणि समाजसेवेच्या दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. त्यामुळे हे पुस्तक भारतीय साहित्यातील एक अमूल्य रत्न मानले जाते. श्यामची आई या पुस्तकातील [illegible] शब्द खूप भारी आहे. यात श्यामच्या आईवर जीवापाड प्रेम करणारी सखी म्हणजे मांजर. ज्या ठिकाणी श्यामच्या आईने प्राण सोडले त्याच ठिकाणी त्या सखीने पण सोडले. सखी खूप प्रेम करत होती. सखीला आईच्या प्रेमाशिवाय जगणे विषमय वाटते. कारण श्यामपेक्षा जास्त प्रेम सखीचे होते.

• वाचकाचे मत - आईच्या प्रेमाची ताकद किती मोठी असते, हे पुस्तकातून दिसून येते. श्यामच्या आईने त्याच्यावर केलेल्या त्यागाची त्या पुस्तकातून जाणीव होते. हे पुस्तक खूपच भावनादीपूर्ण आणि हृदयस्पर्शी आहे. श्यामच्या आईच्या प्रेमाची आणि त्यागाची कहाणी वाचकांना खूपच भावुक करेल. श्यामच्या आईने प्रेमाची आणि त्यागाची कहाणी वाचकांना खूपच प्रेरणा देईल. पुस्तक समाजातील गरिब आणि वंचित वर्गाच्या समस्यांवर प्रकाश टाकते. त्यातून आपल्याला असे कळते की श्यामची आई संघर्षाची कहाणी सांगते. आपल्याला या पुस्तकातून आईच्या प्रेमाबद्दल आणि त्याच्या महत्वाबद्दल जाणिव होते.

पुस्तकातील पात्रे जसे श्याम, त्याची आई, आणि इतर गावकरी यांच्या माध्यमातून लेखकाने सामाजिक संबंध, प्रेम आणि त्याग यांचे सुंदर दर्शन घडवले आहे. पुस्तकाची भाषा साधी, सोपी आणि सुंदर आहे, ज्यामुळे वाचकाला पुस्तकाच्या कथेत सहजपणे बुडून जाण्याची संधी मिळते. पुस्तकाच्या शेवट वाचकाला भावुक बनवते आणि त्यांच्या मनात श्याम आणि त्यांच्या आईच्या भावना व्यक्त होतात. या पुस्तकातून असे वाटते की त्यांच्या स्वतःच्या आईच्या प्रेमाची आठवण करुन देईल आणि त्यांना त्यांच्या आईच्या प्रेमाचे महत्व जाणवते.

या पुस्तकात साने गुरुजींनी आईच्या प्रेमाचे आणि त्यागाचे विविध पैलू वर्णन केले. पुस्तकातील सामाजिक संदर्भ आणि उदाहरणे अद्ययावत करण्याची गरज आहे. हे बदल सामाजिक संदर्भ परिवर्तने आणि सांस्कृतिक विविधता यांचा विचार करुन केले पाहिजेत. पुस्तकात लिंग समानतेच्या संकल्पनेचा समावेश करण्याची गरज आहे. हे बदल लिंग भूमिका आणि समानता यांच्या संदर्भात केले पाहिजेत. हे बदल करताना बालविकास आणि मानसशास्त्र या क्षेत्रातील नवीन संशोधने आणि शोध यांच्या आधारे केले पाहिजे. पुस्तकातील कथा अधिक रोचक आणि संवादात्मक बनविण्यासाठी लेखकाने अधिक विविध आणि आकर्षक शैली वापरावी. पुस्तकातील पात्रे अधिक विकसित आणि त्रिमितीय बनविण्यासाठी लेखकाने त्यांच्या भावनांचा समावेश केला पाहिजे. पुस्तकाच्या वेग अधिक चांगला आणि बनविण्यासाठी लेखकाने कथेच्या वेगाचा विचार करावा.

(3)

*******